# पोलीस आयुक्तालय,
## मिरा-भाईंदर,वसई-विरार
सेक्टर-५, शांतीगार्डन, मिरारोड(पूर्व),जि.ठाणे ४०११०७
Phone No.022-29451003,
Email ID- cpoffice.mb-vv@mahapolice.gov.in


जा.क्र.पोआ/मिभावविं/आस्था-१/ पोना ते पोहवा/पदोन्नती/ १६५ / २०२५ दिनांक २०/०३/२०२५

**संदर्भ** :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी -२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दि.०७/०५/२०२१
३. महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्रमांक :- पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दि.२५फेब्रवारी, २०२२
४. मा.पोलीस महासचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडील पत्र क्र.पोमसं/६/१३६/ सेवाजेष्ठता/मिभावविं/२०२२ दि.२७/०१/२०२३
५.जा.क्र.पोआ/मि.भा.व.वि./आस्था-१/पो.अंमलदार/सेवाजेष्ठता यादी/६१/२०२५ दि.०३/०२/२०२५

**विषय** :- पोलीस नाईक ते पोलीस हवालदार पदात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीबाबत.

-------ooo--------

**आदेश:-**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. बीसीसी/२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मधील निर्देशानुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन राहून मिरा-भाईदर, वसई विरार आयुक्तालयाचे आस्थापनेवरील खालील नमूद पोलीस नाईक यांना दि.२५/०४/२००४ रोजीच्या सेवाजेष्ठतेच्या स्थितीनुसार **पोलीस हवालदार** (वेतन स्तर एस-०९ मधील रु.२६४००- रु.९३६००) या पदावर प्रत्यक्ष कार्यभार स्विकारल्या दिनांकापासून **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती** देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदाराचे नाव | नेमणूक |
|---|---|---|
| १ | पोना/९०००९ सय्यद रज्जाक सैयद गणी हकीम | विरार पोस्टे |
| २ | पोना/९२०४६ दिगंबर बाबुराव शेटे | विशेष शाखा,मि.भा.व.वि. |
| ३ | पोना/०३०६५ रोहिदास शंकर परदेशी | उत्तन पोस्टे |
| ४ | पोना/०६११२ विठ्ठल अर्जुन शिंदे | वालीव पोस्टे |
| ५ | पोना/०७०८५ वैभव विजयकुमार जाधव | वसई पोस्टे |

२. सबंधीत प्रभारी अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.वशिअ/१२१४/प्र.क्र.५२(२)/११, दि.१७/११/२०१४ परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे पदोन्नती दिलेल्या पोलीस अमंलदार यांनी मार्च-२०२४-२५ अखेर पावेतोची मत्ता व दायित्वाची विवरणपत्रे सादर केल्याची पडताळणी करुन किंवा सादर केल्यानंतरच त्यांना पदोन्नती स्विकारण्यास परवानगी द्यावी.

Scanned with CamScanner

३. सबंधित पोलीस अंमलदार यांनी पदोन्नती स्विकारल्याचा दिनांक स्टेशन डायरी नोंदीसह सबंधित प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ इकडील कार्यालयास कळवावा. तात्पुरती पदोन्नती देण्यात आलेल्या अमंलदारांपैकी जे अमंलदार सद्या रुग्णनिवेदन रजेवर/अर्जित रजेवर अशा अमंलदारांनी ते कर्तव्यावर हजर झाले दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येवून तसे या कार्यालयात कळवावे.

४. उपरोक्त नमूद पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार पदी पदोन्नती ही मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचीका क्र. २८३०६/२०१७ चे अंती निर्णयाचे अधिन राहून देण्यात येत आहे. सबब सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे सबंधित अमंलदार यांना नियमीत पदोन्नतीचे, म्हणजेच सेवाजेष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत. तद्नंतर शासनाकडील सुधारीत निर्णयानुसार याची सर्व सबंधीत पोलीस अमंलदार यांनी नोंद घ्यावी.

५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ अन्वये निर्गमीत शासन निर्णयात काही सुधारीत सुचना प्राप्त झाल्यास पदोन्नत झालेले पदाची निवडसुची तसेच, जेष्ठतासुची सुधारीत झाल्यास पदोन्नत होणाऱ्या पोलीस अमंलदार यांचे जेष्ठतासुची मधील स्थानात बदल अथवा पदावनत होणे या बाबी उद्भवू शकतात याची नोंद घ्यावी.

६. उक्त नमूद तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असेलेल्या पोलीस हवालदार यांचेविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असल्यास अथवा निलंबनाची कारवाई केली असेल, न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील, तर सबंधीत प्रभारी अधिकारी यांनी त्यांना पदोन्नतीच्या पदावर कार्यभार स्विकारण्यास परवानगी न देता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती तात्काळ या कार्यालयास सादर करावी.

७. पदोन्नती देण्यात आलेल्या वरील कोणत्याही पोलीस अमंलदार यांनी पदोन्नती स्विकारण्यास नकार दिल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.एसआरव्हि/२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दि.१२/०९/२०१६ अन्वये त्यांना पदोन्नतीचा हक्क गमवावा लागेल. तसेच पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या निवड यादीतून त्यांचे नाव काढून टाकण्यात येवून पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूची मध्ये त्यांचा पदोन्नतीसाठ विचार न करता तिसऱ्या वर्षीच्या निवडसूचीत पदोन्नतीसाठी पात्रता तपासण्यात येईल, याची समज सबंधीत पोलीस अमंलदार यांना देण्यात यावी. पदोन्नती नाकारलेल्या पोलीस अमंलदार यांचे अर्ज घेऊन संबधीत प्रभारी अधिकारी यांनी या कार्यालयास तात्काळ सादर करावयाचे आहेत.

८. पदोन्नत अमंलदार यांनी पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र.एसआरव्हि/ ७१०८७/३१११/ प्र.क्र.११/८९/१२, दि.३०/०४/२०२१ मधील आदेशानुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच अशा अमंलदारांना कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत अश्वासीत प्रगती योजना/सुधारी सेवांतर्गत अश्वासीत प्रगती योजनेचा पहिला/दुसरा व तीसरा लाभ मंजूर करण्यात आला असल्यास, वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३/०९/२०१५ मधील तरतुदीनुसार सदरचा लाभ काढून घेण्यात येईल. मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

९. उक्त आदेशामधील या घटकातील जे प्रतिनियुक्तीवर अमंलदार आहेत, त्यांना मुंबई पोलीस नियमावली भाग-१ (प्रशासन) नियम ८० अन्वये नियमानुसार पदोन्नती देण्यात आली असून , सदर पोलीस अमंलदार यांनी पदोन्नती पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक या कार्यालयास विनाविलंब कळवावा. प्रतिनियुक्ती ठिकाणी पदोन्नती स्विकारलेले पद रिक्त नसल्यास व त्यांनी पदोन्नती नाकारल्यास त्याबाबतची माहिती या कार्यालयास प्रतिनियुक्ती घटक प्रमुखांनी सत्वर कळवावी.

Scanned with CamScanner

१०. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पीओचवा/१०८२/सीआर/११००(२)ओसईआर-३, दि.६/११/१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासुन १ महीन्याचे आत द्यावा. मुदतीत विकल्प सादर न केल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन)नियम, ११ (१)(अ) अन्वये करण्यात येईल याबाबत सर्व संबधीत पोलीस अंमलदार यांनी नोंद घ्यावी..

**पदोन्नती मिळालेल्या पोलीस अमंलदार यांचे अभिनंदन व त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.**

२०/०८/२५

(सुहास बावचे)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
मिरा-भाईंदर,वसई-विरार

**प्रति,**

सर्व संबधीत पोलीस अंमलदार, मि.भा.व.वि.

**प्रत,**

सहाय्यक पोलीस आयुक्त,मुख्यालय, मि.भा.व.वि.
राखीव पोलीस उप निरीक्षक / पोलीस निरीक्षक नि.कक्ष

प्रत,

कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा / ई- पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी

प्रत सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त मि.भा.व.वि.
मा. अपर पोलीस आयुक्त मि.भा.व.वि.

Scanned with CamScanner